# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

## <u>जाहीर सूचना</u>

सार्वजनिक उद्दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या इमारती अनुज्ञा व अनुज्ञप्ती तत्त्वावर परिरक्षण व व्यवस्थापना करिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणांस सुधार समिती ठराव क्र. 172 दि.20.02.2020 व महानगरपालिका ठराव क्र. 159 दि.24.11.2020 अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या बांधीव इमारती या विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठी जसे की, शिवणकामाचे प्रशिक्षण, अंतर्गत खेळ, प्रौढ शिक्षण अभियान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, सांस्कृतिक, शैक्षणिक, स्त्री व मुलांचे संगोपनाचे कार्यक्रम, कल्याणकेंद्र, योगाभ्यासकेंद्र, विपश्यना केंद्र, कुटुंब कलहातील समुपदेशन, सामाजिक उद्दिष्टे इत्यादीकरिता वितरीत करता येतील. या अनुषंगाने खालील समाजकल्याण केंद्र मतीमंद मुलांकरिता चालविले जाणारे केंद्र (Autism Spectrum Disorder) म्हणून पात्र संस्थेस वितरित करावयाचे आहे. त्यानुसार मतीमंद मुलांकरिता प्रत्यक्ष कार्य करणा-या संस्थांनी अर्ज सादर करावेत.

| **जागेचा तपशील** | **बांधीव सुविधेचा तपशील** |
|---|---|
| न.भू.क्र. १/३८/३अे/२ व्हिलेज ओशिवरा,अंधेरी (प.) | क्षेत्रफळ -३५५.४४ चौ. मी.<br>(तीसरा व चौथा मजला) |

1) अर्ज करणारी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम 1950 या दोन्ही अधिनियमानुसार मागील 5 वर्षांपासून (अर्ज मागविण्याच्या दिनांकापूर्वी) नोंदणीकृत असावी.

२) समाजकल्याण केंदाचे वाटप मतीमंद मुलांकरिताचे केंद्र म्हणून करण्यात येणार असल्याने अर्जदार संस्थेकडे मतीमंद मुलांकरिता कार्यक्षेत्रातील (Autism Spectrum Disorder) कमीत-कमी ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासंदर्भात कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करणे.

3) संस्थेची मागील तीन वर्षाच्या कालावधीतील किमान वार्षिक उलाढाल रुपये पाच लाख असावी. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या ५०% पेक्षा कमी नसावी. मागील तीन वर्षांच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद अर्जासोबत सादर करावा लागेल.

४) संस्थेच्या नावे स्वतंत्र पॅन क्रमांक (आयकराचा स्थायी खाते क्रमांक) असावा.

५) संस्था आयकर प्रपत्र सादर करणारी / करदाती असावी आणि मागील 3 वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यात यावे.

६) अर्जासोबत इसारा रक्कम रु.10,000/- रोखीत पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात महापालिकेस भरणा करण्यात यावी.

७) संस्थेचे सादरीकरण करीता गुणांकन असल्याने निवडीच्या वेळी संस्थेचे कार्य व इतर तपशिलासंदर्भात सर्वसमावेशक सादरीकरण करणे आवश्यक.

८) पात्र संस्थेस प्रथमत: ११ महिन्यांकरिता अनुज्ञा व अनुमती तत्वावर रु ५/- प्रति चौ. फूट प्रति महिना या दराने अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा करावा लागेल.

९) पात्र संस्थेस दोन वर्षाच्या अनुज्ञप्ती शुल्काइतकी रक्कम व्याज विरहीत सुरक्षा ठेव म्हणुन महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.

**समाजकल्याण केंद्राचे वाटप “मतीमंद मुलांकरिता चालविले जाणारे केंद्र” (Autism Spectrum Disorder या उद्दिष्टपुर्तीकरिता करण्यात येत असल्याने व मतीमंद मुलांकरिता (Autism Spectrum Disorder) कार्य करणा-या संस्थेस समाजकल्याण केंद्राचे वाटप करावयाचे असल्याने निवडीदरम्यान मुल्यमापन करतांना खालील बाबींचाही प्राधान्याने विचार केला जाणार असल्याने संस्थांनी खालील बाबी संदर्भातील कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करावे.**

1) संस्थेकडे सदर केंद्र चालविण्याबाबत पुरेसा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असल्याबाबतचा तपशिल अर्जासोबत सादर करणे आवश्यक.
2) मतीमंद मुलांना संस्थेतर्फे देण्यात आलेल्या प्रशिक्षणाबाबतचा मतीमंद मुलांच्या नावासहितचा तपशिल वर्षनिहाय आकडेवारी सहित सादर करावा
3) संस्थेस प्राप्त गुणगौरव/प्रमाणपत्रे/ पारितोषिके यासंदर्भातील कागदोपत्री पुरावे.
4) संस्थेतर्फे प्रशिक्षण देण्यात येत असलेल्या मतीमंद मुलांचा इतर शाळेतील मुलांसोबत समन्वय साधण्या संदर्भात केलेल्या कार्याबाबतचा तपशिल असल्यास सादरीकरणामध्ये सदर बाबीचा अंतर्भाव करावा.
5) संस्थेकडून मतीमंद मुलांकरिता प्रशिक्षित करण्यात आलेल्या मुलांनी विविध क्षेत्रातील नैपुण्य/कौशल्य प्राप्त केल्यासंदर्भातील कागदपत्रे.

6) मतीमंद मुलांकरिता संस्थेतर्फे राबविण्यात येणा-या उपक्रमामुंळे मतीमंद मुलांच्या विकासास मिळालेली चालना याबाबतची सहपत्रे.
7) संस्थेमार्फत मतीमंद मुलांच्या पालकांकरिता प्रशिक्षण देण्यात येत असल्यास त्या संदर्भातील तपशिल अर्जासोबत सादर करावा.

सुलभ संदर्भाकरिता समाजकल्याण केंद्रांच्या वाटपाच्या धोरणाची प्रत महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

समाजकल्याण केंद्राचे वाटप करताना मतीमंद मुलांकरिता चालविले जाणारे केंद्र (Autism Spectrum Disorder) हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असल्याने या क्षेत्रात कार्य करणा-या संस्थांनी समाजकल्याण केंद्र वाटपाच्या मंजुर धोरणातील पात्रतेच्या निकषानुसार लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. १३.०७.२०२२ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयामध्ये सादर करावेत. विहीत मुदती नंतर सादर केल्या जाणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्य कार्यालय,
विस्तारित इमारत, 4था मजला,
फोर्ट, मुंबई - 400 001

सही/- दि. २८.०६.२०२२

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**